# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com

संकेतस्थळ : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४१७/ 2923

दि.१८ सप्टेंबर,२०१८

## प रि प त्र क

**विषयः- सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषी महाविद्यालय, हाळगाव ता. जामखेड जि. अहमदनगर हया शासकीय महाविद्यालयाचा वाढीव प्रवेश प्रक्रियेत समावेश करण्याबाबत.**

संदर्भः- कृषी परिषदेचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/२०९६, दि. १४/९/२०१८

कृषी परिषदेच्या संदर्भीय परिपत्रकानुसार राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाचा वाढीव प्रवेश कार्यक्रम सध्या चालू असून दि. २३ व २४ सप्टेंबर,२०१८ रोजी जागेवरील प्रवेश फेरी निश्चित करण्यात आलेली आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषी महाविद्यालय, हाळगाव ता.जामखेड जि. अहमदनगर हया शासकीय महाविद्यालयासाठी सदर वाढीव प्रवेश कार्यक्रमांतर्गत 'जागेवर प्रवेश फेरी' राबविण्याबाबत शासन पत्र क्र. मफुवि १४१८/नप्र.क्र.११४/७-अे, दि.१५/९/२०१८ अन्वये सूचना प्राप्त झालेल्या आहेत.

यास्तव कृषी परिषदेच्या संदर्भीय दि. १४/९/२०१८ रोजीच्या परिपत्रकानुसार निश्चित केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे व सदर परिपत्रकात पात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषी महाविद्यालय, हाळगाव ता. जामखेड जि. अहमदनगर या महाविद्यालयात प्रवेश देण्याकरिता, **दि. २३ व २४ सप्टेंबर,२०१८ रोजी "डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, राहुरी जि. अहमदनगर ४१३ ७२२"** या ठिकाणी जागेवर प्रवेश फेरी राबविण्यात येणार आहे. सदर महाविद्यालयातील जागांचा प्रवर्गनिहाय तपशील संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. हे महाविद्यालय प्रथमतः काही कालावधीकरिता महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी परिसरात सुरु करण्यात येणार असून या महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहाची सुविधा उपलब्ध नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

त्यानुसारच, कृषी परिषदेच्या संदर्भीय दि. १४/९/२०१८ रोजीच्या परिपत्रकानुसार पात्र असलेल्या प्रवेशोच्छुक उमेदवारांनी वरील ठिकाणी मूळ कागदपत्रे व आवश्यक त्या शुल्कासह उपस्थित रहावे, असे या परिपत्रकानुसार आवाहन करण्यात येत आहे.

सदरचे परिपत्रक http://www.dtemaharashtra.gov.in / http://www.mcaer.org / maha-agriadmission.in या संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

(हरिहर कौसडीकर)
संचालक (शिक्षण)

(कृ. मा. प.)

प्रतः-

१. **मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि.**, तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे ४११ ०२९.

यांना सूचित करण्यात येते की, अंतिम गुणवत्ता यादीतील उमेदवारांना सदर परिपत्रकाच्या संकेतस्थळावरील उपलब्धतेबाबत भ्रमणध्वनी संदेश पाठवावेत.

२. **मे. जे. डीन. सॉफ्ट**, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे

यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरच्या परिपत्रकास संकेतस्थळावर प्रसिध्दी द्यावी.

३. **मा.आयुक्त,** राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेसर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१.

यांना विनंती करण्यात येते की, ज्या उमेदवारांनी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा दिलेली आहे, अशा उमेदवारांना सदर शासकीय महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रियेविषयी अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून भ्रमणध्वनी संदेश पाठविण्याबाबत संबंधितांना योग्य ते आदेश व्हावेत. तसेच मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., पुणे यांना सदर महाविद्यालयाचा वाढीव प्रवेश कार्यक्रमामध्ये समावेश करण्याविषयी योग्य ते आदेश व्हावेत.

४. **कुलसचिव**, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर

यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक कृषी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषी महाविद्यालय, हाळगाव या महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, राहुरी येथे योग्य ती व्यवस्था करून त्यासाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने दिलेल्या सूचनानुसार प्रवेश प्रक्रिया निरीक्षक नियुक्त करावा. प्रवेश परीक्षा निरीक्षकाने प्रवेश प्रक्रियेचा अहवाल महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेकडे सादर करावा.

४. **कुलसचिव,** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी

यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक कृषी विद्यापीठांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

५. **कक्ष अधिकारी (७-अे),** कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना दि. १५/९/२०१८ रोजीच्या शासन पत्रास अनुसरून माहितीस्तव सादर.